# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २६/०९/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०८ स. ११.३० वा.**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | साहित्य जल्लोष हा साहित्यिक , सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्रम साहित्य जल्लोष प्रतिष्ठान, विद्यावर्धिनी संस्थेचे अण्णासाहेब वर्तक महाविदयालय आणि वसई -विरार महानगरपालिका यांच्य संयुक्त विद्यमाने करण्याबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरील विषयावर स्थायी समिती सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार 'साहित्य जल्लोष ' हा साहित्यिक,सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्रम:- 'साहित्य जल्लोष ' हा साहित्यिक,सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्रमवसई - विरार शहर महानगरपालिका विद्यावर्धिनी संस्थेचे अण्णासाहेब वर्तक महाविदयालय आणि साहित्य जल्लोष प्रतिष्ठान, संयुक्त विद्यमाने रविवार दि.७ ऑक्टोबर २०१८रोजा सकाळी १०.०० ते रात्री ८.०० या वेळेत अण्णासाहेब वर्तक महाविदयालयातील के.सी.राजाणी सभागृहात साहित्य जल्लोष हा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा त्यासाठी आजची स्थायी समितीची सभा प्रशासकी य मंजूरी देत आहेत. तसेच त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.८,००,०००/- (आठ लक्ष रु मात्र) इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तसेच कार्यक्रमाची पुर्व प्रसिध्दी करणेसाठी निमंत्रण पत्रिका छपाई करणे , लाकडी फ्रेमसह फ्लेक्स बॅनर छपाई, लाकडी फ्रेमसह स्टेज बॅनर छपाई, वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, हॅण्डबिल छपाई करणे, विद्यार्थ्यासाठी व कवीसाठी प्रशस्तिपत्र छपाई करणे , इत्यादी साहित्याची व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच कार्यक्रमासाटी येणारे उद्घाटक ,प्रमुख पाहुणे, कवी, साहित्यिक ,इतर मान्यवर यांचे स्वागत व सत्कार करण्यासाठी पुष्पगुच्छ, शॉल, श्रीफळ,आरतीचे सामान, सन्मान चिन्हे (ट्रॉफी ) , इत्यादी साहित्याची व्यवस्था करावी लागणार आहे. कार्यक्रमासाटी येणारे उद्घाटक ,प्रमुख पाहुणे, कवी, साहित्यिक, इतर मान्यवर यांच्यासाठी अल्पोपहार ,चहा, व कॉफा,सिलबंद पाणी ,पाण्याचे जार,भोजन (शाकाहारी व मांसाहारी )इत्यादी साहित्याची व्यवस्था करावी लागणार आहे, या व्यतिरिक्त स्टेज व मंडप व्यवस्था, ध्वनी योजना (साऊंड सिस्टीम), प्रकाश योजना,गादयांची बैठक,व्ही.आय. पी.खुर्च्या, झालरसह लाकडी टेबल , व्हीडीओ शुर्टीग, फोटोग्राफी इ. व्यवस्था करावी लागणार आहे. वरीलपैकी कार्यक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर असलेल्या वार्षिक निविदाधारकाकडून खरेदी करण्यात याव्यात तसेच सन्मान चिन्हे (ट्रॉफी ) खरेदीकामी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक दराच्या ई- निविदा मागविण्यात आल्या असून त्या मंजूरीच्या प्रक्रियेत आहेत. परंतु मंजूरीची प्रक्रियेला विलंब लागणार असून कामाची अडचण होऊ नये म्हणून दरपत्रक मागवून उपरोक्त साहित्य मागविणे योग्य होईल.सदरचे दरप्रत्रक मागविण्यास येणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये ६०,०००/- (अक्षरी साठ हजार मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. कार्यक्रमासाठी येणारे उद्घाटक ,प्रमुख पाहुणे, कवी, साहित्यिक ,इतर मान्यवर यांना त्यांनी केलेल्या मागणीनुसार कार्यक्रमाचे उद्घाटक श्री.लक्ष्मीकांत देशमुख (१०,०००/-), साहित्यिक श्री.अशोक बागवे (१०,०००/-), साहित्यिक श्री.अरुण म्हात्रे (१०,०००/- ) यांचे मानधन प्रत्येकी १०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र ) याप्रमाणे ३०,०००/- मात्र मानधन रोख्रीने/धनादेशद्धारे /आर.टी.जी.एस. द्धारे देण्यात यावे तसेच श्री. अशोक हांडे यांच्या अत्रे अत्रे सर्वत्रे या कार्यक्रमाचे मानधन २,३६,०००/- (अक्षरी दोन लाख छत्तीस हजार मात्र ) धनादेशव्दारे साहेबराव ठाणगे (२०००/-) मंगेश विश्वासराव (२०००/-), ज्योती निसळ (२०००/-), भारत दौंडकर (३०००/-), रमझान मुल्ला |

| | | |
|---|---|---|
| | | (३०००/-), त्रिमुर्ती जागर (१५,०००/-) यांचे मानधन व इतर साहित्यिकाचे मानधन रोखीने देण्यात यावे. तसेच लोकनृत्याविष्कार या कार्यक्रमाचे मानधन ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र ) या व्यतिरीक्त इतर साहित्यिकांचे मानधन ४०,०००/-(चाळीस हजार मात्र ) रोखीने देण्यांत यावे. प्रमुख पाहुण्याची निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी १०,०००/ रोखीने उपलब्ध करुन देण्यांत यावे. कार्यक्रमाचे सर्व प्रकारचे मानधन अदा करणे कामी येणाऱ्या खर्चास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. वरील प्रमाणे कार्यक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य उपलब्ध करुन घेण्यास व त्यापोटी मंजुर निविदाधारकास होणारे देयक अदा करण्यास तसेच दयावयाचे मानधन या व इतर अनुशंगीक बाबींकरीता होणाऱ्या खर्चास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील   सूचक :- मा.श्री. किशोर ना. पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका